सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
ापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
POSTAL REG NO. SLP/32/2015-2017
रा | मंगळवार, दि. ५ डिसेंबर २०१७ | युगाब्द ५११९ | शिवशक ३४४ | पाने ८ | किंमत ४ रुपये | वर्ष २ रे अंक १०२

डी. पी. भोसले ग्रंथालय कोरेगाव

# डी. पी. भोसले कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा

## सचिन धोत्रेची ऑल इंडियासाठी निवड



**कोरेगाव, ४ डिसेंबर**

डी. पी. भोसले कॉलेजचा धावपटू सचिन धोत्रे याने अश्वमेध क्रीडा स्पर्धेत वैयक्तिक क्रीडा प्रकाराबरोबरच सांघिक क्रीडा प्रकारात यश मिळवत कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुराच रोवला आहे. दरम्यान, या कामगिरीमुळे सचिनची ऑल इंडियासाठी निवड झाली आहे. महाविद्यालयांमध्ये गेली २ वर्षे चारशे मीटर धावणे मार्ग तयार झाला आहे. पण यासाठी रयत शिक्षण संस्था व महाविद्यालयाच्या प्रशासनाने प्रचंड मेहनत करुन हा धावणे मार्ग तयार केला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या प्रेरणेने खेळाडूंची वाटचाल सुरु आहे. डॉ. बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे दि. २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर दरम्यान झालेल्या २१ वी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत या महाविद्यालयाचा वेगवान धावपटू सचिन धोत्रे याने २०० मीटर या क्रीडा प्रकारात चतुर्थ क्रमांक मिळवला. या यशासोबतच त्याने चारशे मीटर व १६०० मीटर रिले या क्रीडा प्रकार सिल्व्हर मेटल शिवाजी विद्यापीठाला मिळवून दिले आणि दोन्ही रिलेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करत सर्वात बेस्ट रेकॉर्ड सचिन याने केले. यातूनच त्याची ऑल इंडियासाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव प्रा. डॉ. बी. के. कराळे, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, ज्युनिअर क्रीडा विभाग प्रमुख पाटील, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार यांनी अभिनंदन केले. सचिनला प्रा. बी. डी. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

तभा प्रतिनिधी